05

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station नापप्रवि पहिली खबर क्र. FIR No. २६ वर्ष Year २०२६ दिनांक Date १०.०१.२०२६

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ...... कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ...... तारीख पासून Date from ०७.०१.२६ वेळ Time ...... तारीख पर्यंत Date to ०९.०१.२६ वेळ Time १२.५०

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०८.०१.२०२६ वेळ Time ......

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१/२०२६ तारीख Date १०.०१.२०२६ वेळ Time ००.३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ...... लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ...... चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ......

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name विवाह नोंदणी कार्यालय ठिकाणाचे नंबर No. if any सेतू कार्यालय गल्ली Ward के/पश्चिम विभाग रस्त्याचे नाव Name of road बृहन्मुंबई महानगर पालिका

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name रेखा कृष्णाजी काळे
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name कृष्णाजी काळे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५८ वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९३२३६५८०३५
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ......
(f) व्यवसाय Occupation ......
(g) धर्म Religion हिंदू जात Caste मराठा जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता Address बि. नं. २७ गल्ली/सर्व्हे नं. Ward रूम नं. २ घर/नाव नं. House Name No. वरळी पोलिस कॅम्प, वरळी, मुंबई ३० फोन/मो. नं. Phone No. ...... पॅन नं. Pan No. ...... वोटर्स नं. Card No. ......

रस्त्याचे नाव Road खान अब्दुल गफार खान रोड / ध्यानवाडी रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......

तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री स्वप्निल गोविंद म्हात्रे, ४९ वर्षे, धंदा- नोकरी, पद- लिपिक, सहायक आयुक्त यांचे कार्यालय, के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका अंधेरी (प.) मुंबई, रा. श्री कोळपाडी, गाव, कळंब, ता. वसई जि. पालघर मो. क्र. ७८७५५६०५२२

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्रीमती रेखा कृष्णाजी काळे, पोलिस निरिक्षक लाप्रवि, मुंबई यांची स्वलेख पानावर दि. १०.०९.२०२१ रोजी नोंदविण्यात आलेली फिर्याद/जबाब हाच नमुद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात यावा.

समक्ष

[signature]

(हरिदास किल्लेदार)
सहा. पोलीस आयुक्त
ला. प्र. वि. मुंबई.

फिर्यादी

[signature]

(रेखा काळे)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद

दिनांक १०/०९/२०२६

मी, रेखा कृष्णाजी काळे, वय ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. मोबाईल क्रमांक ९२२६८५८०३५.

मी वरील प्रमाणे असून, ऑगस्ट २०२४ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नेमणुकीस आहे.

मी, दिनांक ०८/०९/२०२६ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात सकाळी ०९.४५ वा. दरम्यान कर्तव्यावर हजर झाले. मा. वरिष्ठांनी मला तसेच स.पो.आ. श्री. हरिदास किल्लेदार असे दोघांना त्यांच्या कार्यालयात बोलावून ला.प्र.वि. कार्यालयात लोकसेवकाच्या विरोधात तक्रार देण्याकरीता आलेले श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांची ओळख करून देवून त्यांची सविस्तर तक्रार ऐकून सापळा अधिकारी म्हणून मला पुढील योग्य ती कारवाई करण्याचे आदेशित केले. तसेच स.पो.आ. हरिदास किल्लेदार यांना पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नियूक्त केले. त्यानंतर मी व सपोआ हरिदास किल्लेदार तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांना माझे कक्षात घेवून आलो.

मी आणि सपोआ किल्लेदार यांनी तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांच्याकडे त्यांच्या तक्रारीबाबत विचारणा केली असता, त्यांनी माहिती दिली की, त्यांचे पुर्ण नाव मोहम्मद फुरकांन कुदुदबुद्दीन अवटी राठीः- मक्का मस्जिद जवळ, गीलबटहिल रोड, बीएमसी ऊरदु शाळेच्या विरूध्द, एस.एम.टिपुसुलतान रोड, अंधेरी (पश्चिम) मुंबईः-४०००५८ असे आहे. तक्रारदार यांनी दिनांक ०५.०९.२०२६ रोजी ऑनलाईन पद्धतीने बृहन्मुंबई महागनर पालिकेच्या संकेतस्थळावर त्यांच्या विवाहाचा दाखला मिळणेकरीता अर्ज केला असून त्याचा मॅरेज ॲपलिकेशन फॉर्म नंबर _००५०६५३२७९ असा भरून त्यांनी अधिकृत फि १५.७६ रूपये भरलेली आहे. तक्रारदार हे त्यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७.०९.२०२६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका के/वेस्ट वॉर्ड येथे गेले. सदर ठिकाणी के/वेस्ट अंतर्गत आरोग्य विभागामध्ये विवाह चा दाखला देणारे श्री.स्वप्निल म्हात्रे यांची भेट घेतली व श्री. स्वप्नील म्हात्रे यांना त्यांच्या विवाहाची व इतर संबंधीत कादगपत्रे दाखवली. स्वप्नील म्हात्रे यांनी कागदपत्रांची पडताळणी करून त्यामध्ये तक्रारदार यांच्या पत्नीचा मूळ जन्म दाखला सोबत न आणल्यामुळे तक्रारदार यांच्याकडे रू. १,५००/- लाच रक्कमेची मागणी करून दिनांक ०७.०९.२०२६ रोजी तक्रारदार यांना पत्नीचा मूळ जन्म दाखला व रूपये १,५००/- लाच रक्कम घेवून त्यांच्या कार्यालयात बोलावले.

तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांची श्री. स्वप्निल म्हात्रे के/वेस्ट वॉर्ड यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्याकरिता तक्रारदार हे दिनांक ०८.०९.२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे आले. त्यावेळी मी आणि सपोआ हरिदास किल्लेदार यांनी तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांना त्यांची तक्रार त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरात लेखी तक्रार देण्यास सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांनी त्यांच्या स्वहस्ताक्षरात हिंदीमध्ये तक्रार अर्ज लिहून दिला.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तात्काळ पडताळणी कारवाई करण्याकरीता प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांना दोन शासकीय पंच बोलाविण्यास सांगितले. त्याप्रमाणे दोन शासकीय पंच नामे १) श्री. गणेश किसन विटकरे, वय ४३ वर्षे, धंदा- नोकरी, (वरिष्ठ लिपीक), प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य),ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स, तुळशीवाडी ताडदेव, मुंबई ४०००३४. रा.ठि. - रूम नं ३०१, राणकरआळी, घणसोली गाव, नवी मुंबई. तसेच २) श्री. अनिकेत सुभाष चोले, वय ३४ वर्षे, धंदा- नोकरी (राज्यकर निरीक्षक) राज्यकर सह आयुक्त, "ए" विंग चौथा मजला, नोडल १० यांचे कार्यालय, बांद्रा (पुर्व) मुंबई. ४०००५१ हे दोन पंच माझे कक्षात आले. त्यावेळी मी दोन्ही पंचांना तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांची प्रथम ओळख करुन दिली आणि त्यांच्या तक्रारीची थोडक्यात हकिगत सांगितली. तसेच दोन्ही पंचांना तक्रारदार यांचा लेखी तक्रार अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सपोआ हरिदास किल्लेदार तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर पडताळणी क्र. ६४/२०२६, दि. ०८/०९/२०२६ प्रमाणे नोंद घेवून पुढील कारवाई चालू केली.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर, लोकसेवक श्री. स्वप्नील म्हात्रे हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने अवलंबविण्यात येणारी सर्व प्रक्रीया मी व सपोआ हरिदास किल्लेदार यांनी दोन्ही पंच तसेच तक्रारदार यांना समजावुन सांगितली. त्यानंतर मी, सपोआ किल्लेदार, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी असे आम्ही गोपनीय कक्षात गेलो तेथे तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये मोबाईल फोनद्वारे किंवा समक्ष होणारे संभाषण कशाप्रकारे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येईल याची माहिती दोन्ही पंच व तक्रारदार यांना दिली. त्यानंतर तांत्रिक शाखेचे पो.ह. गायकवाड यांचे मदतीने डि.व्ही.आर मधील नवीन कोऱ्या एस.डी. कार्डमध्ये मी, तक्रारदार व पंच असे आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर दिनांक ०८/०९/२०२६ रोजी १६:१० वा. मी, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे पथक लाप्रवि कार्यालयातून सापळा कारवाईकरीता लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक कार्यरत असलेल्या के/वेस्ट अंधेरी कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी दिलेल्या आदेशाप्रमाणे दोन्ही शासकीय वाहने लोकसेवक कार्यरत असलेल्या के/वेस्ट वॉर्ड कार्यालयापासून काही अंतरावर धनकुंज बिल्डींगसमोर अंधेरी स्टेशन रोड, अंधेरी पश्चिम मुंबई येथील परिसरात थांबली. त्यावेळी १७.०६ वाजले होते.

मी व सपोआ किल्लेदार यांनी दोन्ही पंच, तक्रारदार व पथक यांना पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. माझे सांगण्याप्रमाणे तांत्रिक शाखेचे पोह. गायकवाड यांनी ठिक १७:१७ वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०१, श्री. विटकरे हे लोकसेवक यांना भेटण्यासाठी ते कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. उर्वरीत पथक धनकुंज बिल्डिंगसमोर अंधेरी पश्चिम येथेच थांबून राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. अवटी व पंच श्री. विटकरे हे शासकीय वाहनाजवळ परत आले. त्यावेळी माझे सांगण्याप्रमाणे पो.ह. गायकवाड यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून माझे ताब्यात दिला. त्यावेळी १७:४३ वाजले होते.

त्यानंतर मी पंच क्र. ०१ श्री विटकरे यांचेसमक्ष तक्रारदार श्री अवटी यांचेकडे काय घडले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ते लोकसेवक यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेले असता, लोकसेवक म्हात्रे हे त्यांचे कार्यालय लॉक करत होते. त्यानंतर यांनी त्यांचेकडे ' मेरा तो कर दोना यार' असे बोलून त्यांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्राचा विषय काढला असता, लोकसेवक म्हात्रे तक्रारदारांना म्हणाले की, तुम्हारा क्या कर दु ? डॉक्युमेंट नही है ! मै तुम्हारा कैसे करेगा?' त्यानंतर लोकसेवक म्हात्रे हे तक्रारदारांसोबतच्या पंचांना पाहून कॅन्टीनच्या दिशेने निघून गेले. म्हणून तक्रारदार हे त्यांच्या मागोमाग कॅन्टीनच्या दिशेने गेले असता, लोकसेवक हे तक्रारदारांवर ' अभी क्या कॅन्टीन मे बैठने की चिज है क्या पेपर के साथ में देखना पडेगा ना! अभी घरके भी आके तु दिखाएगा क्या ऐसा कैसा?' असे बोलून तक्रारदारांवर ओरडले. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक म्हात्रे यांना 'बोलो ना! बोलो ना चाय पानी कितना बोलाना कितना बोलो तो सही!' असे बोलले असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना ' मै तेरेको देड बोला था ना पहिले!' त्यावर तक्रारदार हे लोकसेवक यांना' हजार लेलो ना!' दो हजार?' असे बोलले असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे 'हां 'असे बोलून रू. २०००/- रकमेच्या लाचेची मागणी केली. यावर तक्रारदार यांनी लोकसेवक म्हात्रे यांना पाच मिनीटात पैसे आणून देतो असे सांगून पोलीस वाहनाजवळ निघून आले. अशाप्रकारे लोकसेवक म्हात्रे व तक्रारदार श्री. अवटी यांच्यात चर्चा झाल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले.

त्यानंतर मी पंच श्री विटकरे यांचेकडे पडताळणी दरम्यान लोकसेवक व तक्रारदार यांच्यामध्ये काय संभाषण झाले याबाबत विचारणा केली असता, पंच क्र. ०१ श्री. विटकरे यांनी सांगितले की, ते तक्रारदार यांच्यासोबत लोकसेवक यांच्या कार्यालयात गेले परंतू त्यांना पाहताच लोकसेवक हे कॅन्टीनच्या दिशेने निघून गेले, लोकसेवक यांना संशय येत असावा म्हणून तक्रारदार यांनी पंच विटकरे यांना लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या बाहेरच थांबण्याचा इशारा केला. म्हणून पंच विटकरे हे लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या बाहेर निघून गेले व तक्रारदार यांची वाट पाहत उभे होते. काही वेळाने तक्रारदार कार्यालयाच्या बाहेर आले व पंच विटकरे हे तक्रारदार यांच्या पाठोपाठ पोलीस वाहनाजवळ आले.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी व मपोआ किल्लेदार यांनी दोन्ही पंचांच्या समक्ष डिव्हीआर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे रू. २०००/- रक्कमेची लाचेची मागणी करून तात्काळ स्विकारण्याचे मान्य केल्याचे आम्हाला स्पष्ट झाले. त्यानंतर आम्ही पंच व तक्रारदार तसेच सापळा पथकास पुढील सापळापूर्व/सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार श्री. अवटी यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये २,०००/- इतकी रक्कम त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. वेळेच्या अभावी मी तक्रारदार अवटी यांचेकडील रू. २,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ४ नोटा) यांचा पंचासमक्ष माझे मोबाईलव्दारे फोटो काढला. तसेच एका कोऱ्या कागदावर सदरच्या नोटांचे क्रमांक लिहीले व त्यावर मी व दोन्ही पंचांनी सहया केल्यानंतर तो कागद माझे ताब्यात घेतला.

त्यानंतर मी दोन्ही पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशि चालक भोईर यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये २,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ४ नोटा) रक्कमेच्या नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार श्री. अवटी यांनी परिधान केलेल्या शर्टच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी पोशिचा भोईर हे सापळा कारवाईमध्ये प्रत्यक्ष भाग घेणार नसल्याचे पंचांना सांगितले. तदनंतर मी, लोकसेवक श्री. स्वप्नील म्हात्रे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या फुल बाहयांचे शर्टच्या दोन्ही हाताच्या बाहया फोल्ड करून सापळा पथकाला दिसेल अशाप्रकारे लाच स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत तक्रारदार यांना सांगितले.

मी व मपोआ किल्लेदार यांनी तक्रारदार, पंच व पथक यांना पुन्हा सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. मी, पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०१ श्री. विटकरे हे लोकसेवक यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी लोकसेवक कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. त्यांच्या मागोमाग आम्ही पथक व पंच क्र.०२ श्री. चोले असे चालत रवाना झालो. तक्रारदार श्री अवटी हे पंच श्री. विटकरे यांचेसह के/वेस्ट वॉर्ड अंधेरी येथील लोकसेवक कार्यरत असलेल्या सेतू कार्यालयात गेले. त्यावेळी मी, मपोआ किल्लेदार व सापळा पथकातील अंमलदार हे ठरल्याप्रमाणे के/वेस्ट वॉर्ड अंधेरी कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीलो. त्यानंतर काही वेळातच तक्रारदार हे लोकसेवक यांच्या कार्यालयातून बाहेर आले व काही इशारा न करताच शासकीय वाहनाच्या दिशेने रवाना झाले. त्यानंतर पंच क्र. ०१ श्री. विटकरे यांनी खुनावल्याप्रमाणे मी, मपोआ किल्लेदार पंच क्र. ०२ व सापळा पथक हे देखील तक्रारदार यांच्या पाठोपाठ शासकीय वाहनाजवळ आलो. त्यावेळी माझे सांगण्याप्रमाणे पो.ह. गायकवाड यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून माझे ताब्यात दिला. त्यावेळी १८:१२ वाजले होते. मी तक्रारदार यांच्याकडे सदर ठिकाणी काय घडले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार अवटी यांनी मी लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांच्या कार्यालयात गेलो त्यावेळी कार्यालय सुटण्याची वेळ झालेली असल्याने लोकसेवक कार्यालयातून निघून गेले असल्याने त्यांनी भेट झाली नसल्याचे सांगितले. म्हणून दि. ०८/०९/२०२६ रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक ०९/०९/२०२६ रोजी लोकसेवक म्हात्रे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ते स्विकारण्याची शक्यता असल्याने नमुद ठिकाणी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक ०९/०९/२०२६ रोजी मी, मपोआ किल्लेदार, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. अवटी असे आम्ही गोपनीय कक्षात गेलो. त्याठिकाणी तांत्रिक शाखेचे पो.ह. गायकवाड यांचे मदतीने डि.व्ही.आर मधील नवीन कोऱ्या एस.डी. कार्डमध्ये मी, तक्रारदार व पंच असे आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

दि. ०८/०९/२०२६ रोजी सापळा पुर्व कारवाई दरम्यान लोकसेवक यांना देण्यासाठी वापरण्यात आलेली लाचेची रक्कम ही तक्रारदार यांच्याकडून ताब्यात घेण्यात आली होती. सदरच्या रूपये २,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ४ नोटा) रक्कमेच्या नोटांना शासकीय वाहनाचे चालक पो. ह. देसाई यांनी पुन्हा ॲन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार श्री. अवटी यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर लाप्रवि कार्यालयातच सापळा कारवाईच्या अनुषंगाने पुर्वतयारी करून तक्रारदार, पंच व पथकास सापळा कारवाई संदर्भात आवश्यक त्या सुचना दिल्या.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे पथक लाप्रवि कार्यालयातून सापळा कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक कार्यरत असलेल्या के/वेस्ट अंधेरी कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी दिलेल्या आदेशाप्रमाणे दोन्ही शासकीय वाहने लोकसेवक कार्यरत असलेल्या के/वेस्ट वॉर्ड कार्यालयापासून काही अंतरावर धनकुंज बिल्डींगसमोर अंधेरी पश्चिम मुंबई येथील परिसरात थांबली. त्यावेळी १२.२० वाजत होते.

सदर ठिकाणी लोकसेवक श्री. स्वप्नील म्हात्रे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या फुल बाह्यांचे शर्टच्या दोन्ही हाताच्या बाहया फोल्ड करून सापळा पथकाला दिसेल अशाप्रकारे लाच स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या रक्कमेसह पंच क्र. ०२ श्री चोले यांचे सोबत लोकसेवक यांचे कार्यालय के/वेस्ट वॉर्ड सेतू विभाग येथे पाठविले. त्या दरम्यान पंच क. ०१ व सापळा पथक हे लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या बाहेरील सेतू विभागात कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले. तक्रारदार यांनी लोकसेवक यांना संशय येवू नये म्हणून पंच क. ०२ यांना बाहेर थांबण्यास सांगितले.

काही वेळाने तक्रारदार श्री. अवटी हे लोकसेवक यांच्या कार्यालयातून बाहेर आले व त्यांनी त्यांच्या शर्टच्या दोन्ही बाहया मागे सरकवून लोकसेवक यांनी लाच स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी व सोबत असलेल्या सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांचे कक्षामध्ये प्रवेश केला. तक्रारदार अवटी यांनी लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांचेकडे हाताने इशारा करून लाच स्विकारल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही व पथकाने लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांना १३.१० वाजता ताब्यात घेतले. सापळा पथकातील पो.ह. चव्हाण यांनी लोकसेवक म्हात्रे यांचा डावा हात व पो.शि. रणे यांनी उजवा हात पकडून लोकसेवक यांना अटकावून ठेवले. पो.ह. गायकवाड यांचे मदतीने तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून मी माझे ताब्यात ठेवला. त्यावेळी १३:१३ वाजले होते. आरोपी लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांस मी व सपोआ किल्लेदार यांनी स्वत:ची ओळख सांगितली. त्यानंतर आरोपी लोकसेवक म्हात्रे यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे पुर्ण नाव स्वप्नील गोविंद म्हात्रे , वय ४९ वर्षे, पद- लिपीक सहाय्यक आयुक्त कार्यालय, के/पश्चिम विभाग, अंधेरी मुंबई. राहि. घोलपट्टी, कळंब, ता- वसई, जि-पालघर असे सांगितले.

मी आरोपी लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांस पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी लाचेची रक्कम त्यांच्या डाव्या हातामध्ये असल्याचे सांगून सदर लाचेची रक्कम ही पंच क्र. १ श्री. विटकरे यांच्याकडे दिली. सदर लाचेच्या रकमेची पंच क्र. १ श्री. विटकरे यांनी पहाणी केली असता, रूपये ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ४ नोटा, असे एकुण रूपये २०००/- असल्याचे त्यांनी सांगितले. सदर लाचेच्या रकमेतील नोटांचे नंबर व कागदावर लिहीलेले सिरियल क्रमांक तंतोतंत मिळून आले.

त्यानंतर मी व सपोआ किल्लेदार यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे श्री. स्वप्नील म्हात्रे कार्यरत असलेल्या कक्षाचे लाईट्स बंद करून काळा कपडा भोवताली पकडून कृत्रीम अंधार तयार करून पंचांसमक्ष मी पथकातील अंमलदार यांच्या मदतीने अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयांची तपासणी केली असता, लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना व तळहातास फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर माझ्या सूचनेनुसार तक्रारदार यांना कक्षात बोलावुन काळा कपडा भोवताली पकडून कृत्रीम अंधार तयार करून अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या सहाय्याने तक्रारदार यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयांची तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या उजव्या हाताच्या बोटांना व तळहातास तसेच पॅन्टच्या मागील खिशाला फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच जप्त करण्यात आलेल्या लाचेच्या रकमेची पाहणी केली असता, लाचेच्या नोटांवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लाईट्स पूर्ववत करण्यात आले.

त्यानंतर लोकसेवक स्वप्नील म्हात्रे यांना ताब्यात घेवुन लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांनी दिनांक ०८/०९/२०२६ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी/सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक

Scanned with OKEN Scanner

स्वप्नील गोविंद म्हात्रे , वय ४९ वर्षे, पद- लिपीक सहाय्यक आयुक्त कार्यालय, के/पश्चिम विभाग, अंधेरी मुंबई यांनी तक्रारदार यांचे विवाहनोंदणी प्रमाणपत्राच्या कामाकरीता तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन अवटी यांचेकडे स्वत:करीता तडजोडीअंती रु. २००० लाचेची मागणी करून ती स्विकारली. म्हणुन माझी लोकसेवक स्वप्नील गोविंद म्हात्रे , वय ४९ वर्षे, पद- लिपीक सहाय्यक आयुक्त कार्यालय, के/पश्चिम विभाग, अंधेरी मुंबई यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( हरिदास किल्लेदार )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्यादी

( रेखा काळे )
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी स्वप्निल म्हात्रे लिपिक के/पश्चिम, बी.एम.सी यांनी तक्रारदार श्री. मोहम्मद फुरकान कुतबुद्दीन यांच्याकडे त्यांच्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या कामाकरिता तडजोडअंती रु. २०००/- रकमेच्या लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारताना आरोपी स्वप्निल म्हात्रे यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले, म्हणून पोलीस रेखा कोळी, ला.प्र.वि. मुंबई यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी म्हात्रे यांच्या विरोधात कलम ०७ भ्र.प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद

**केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमांप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या ..........

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name हरिदास रामचंद्र किल्लेदार

पदनाम Rank सहायक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्रं. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..........

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner